महाराष्ट्र राज्य

# वृक्षतोड नियम आणि प्रक्रिया




आदिवासी खातेदाराच्या मालकीतील झाडांची तोड व विक्री वन विभागामार्फत केली जाते. ते कायदेशीर आणि फायदेशीरही आहे.

वन विभाग महाराष्ट्र राज्य

10:07 PM 0.40K/s Jio 4G 4G VoLTE 42%

# वृक्ष तोड नियम व कार्यपध्दती

वृक्षांचे संरक्षण, संवर्धन व्हावे, जमिनीची धूप कमी व्हावी, आणि पर्यावरणाचा समतोल रहावा यासाठी मालकी क्षेत्रातील खाजगी वने, झाडोरा तोडण्यावर शासनाने काही बंधने घातली आहेत. वृक्षतोडीच्या कार्यपध्दतीचे विविध कायदे व नियम करून नियमन केले आहे. हे कायदे नियम व कार्यपध्दतीची आपण थोडक्यात ओळख करून घेऊन ही माहिती आपल्या मालकी क्षेत्रातील झाडे तोडू इच्छिणाऱ्या व्यक्ती तसेच वृक्षतोडीसाठी परवानगी देणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना उपयुक्त ठरेल. असा विश्वास आहे.

## वृक्षतोडी संबंधी अस्तित्वात असलेले कायदे व नियम

मालकी क्षेत्रातील वृक्ष तोडी बाबतच्या राज्य शासनाने केलेले खालील अधिनियम अस्तित्वात आहेत. –

१. महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम-१९६४ व त्याखालील नियम.

२. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम-१९७५.

३. भारतीय वन अधिनियम-१९२७ चे कलम ३५ (१) व त्या खालील खाजगी जंगले तोडण्यासाठीचे शासनाने कृषी व वन विभाग ठराव क्र. पीआरएफ-१३५३, दिनांक ८-११-१९५५ अन्वये मंजूर केलेले नियम.

४. महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ व त्याखालील नियम (वन खात्याने करावयाच्या अंमलबजावणी बाबत जरूरी सूचना मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे कडील पत्र क्र. डी./२०४१४, दिनांक १२-२-१९६८ व प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील जावक पत्र क्रमांक कक्ष-११/टिएमआर/१/(८३-८४)/५३/(८७-८८), दिनांक १३/४/८८ अन्वये देण्यात आलेले आहे.

५. महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवटदारांच्या झाडांची विक्री (नियमन) अधिनियम-१९६९ व त्या खालील नियम.

वरील पाचही नियम हे राज्य शासनाने महाराष्ट्र जमीन महसूल संहितेस धरून केलेले आहेत. सन १९८९ पूर्वी वृक्ष तोडीस परवानगी देणेचे सर्व अधिकार महसूल खात्यातील अधिकाऱ्यांकडे होते. महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम-१९६४ ला सन १९८८ चे महाराष्ट्र ॲक्ट क्रमांक २६ ने केलेल्या सुधारणामधील तरतुदीनुसार वनक्षेत्रपाल यांना वृक्ष अधिकारी म्हणून अधिकार विधिवत प्राप्त झालेले आहेत.

वरील नियमाबरोबरच महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत अधिनियम १९६४ अंतर्गत वृक्ष तोडीस परवानगी देणे पूर्वी खालील अधिनियमांचे वाचन शासकीय अधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे.

१. महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम-१९७५, व त्याखालील नियम

२. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वाटप) नियम-१९७१.

३. मुंबई टेनन्सी ॲन्ड ॲग्रिकल्चर लॅन्ड ॲक्ट-१९४८ (त्याखालील नियम).

महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत अधिनियम-१९६४ हा अधिनियम "नागरी क्षेत्र" म्हणजे महानगर पालिका, नगरपालिका, विशेष नियोजन प्राधिकरण किंवा यथास्थित विकास प्राधिकरण याखेरीज महाराष्ट्र राज्याच्या सर्व विभागास लागू आहे.

10:07 PM 0.00K/s Jio 4G 4G VoLTE 42%




नागरी क्षेत्र करिता महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ हा अधिनियम लागू आहे.

**वृक्षतोडीसाठी परवानगी आवश्यक असलेले वृक्ष :**

महाराष्ट्र झाडे तोडणे (नियमन) अधिनियम १९६४ अंतर्गत फक्त अनुसूचित वृक्षाचे तोडीस परवानगी देणे कामी, वृक्ष अधिकारी, तथा वनक्षेत्रपाल यांना प्राधिकृत करणेत आलेले आहे. बिगर अनुसूचित वृक्षाचे तोडीस परवानगीची आवश्यकता नाही. तथापि, एखाद्या खातेदारांस मालकीतील फक्त बिगर अनुसूचित झाडोरा तोडलेला असल्यास त्या बाबतीत महाराष्ट्र जमीन महसुल संहिता-१९६६ चे कलम-२५ (२) खालील तरतुदीनुसार तहसिलदारकडील ना हरकत दाखला आवश्यक आहे.

**अनुसूचित वृक्षाची सूचि**

१. हिरडा २. साग ३. मोहा ४. चिंच ५. आंबा ६. फणस ७. खैर ८. चंदन ९. बिबळा १०. हेद ११. तिवस १२. अैन १३. विंजळ १४. अंजन १५. जांभूळ १६. मॅंगुव्ह.

**अ. वृक्षतोड-कार्यपध्दती (बिगर आदिवासी मालकीसाठी)**


वृक्षतोड करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने संबंधित वनक्षेत्राच्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यांत अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. अर्जासोबत खाली नमुद केलेली कागदपत्रे, दाखले, दस्ताऐवज जोडणे महत्त्वाचे आहे. सदर कागदपत्रे आहेत किंवा कसे ? याची वन परिक्षेत्र अधिकारी यांनी दक्षता पूर्वक पडताळणी करणे आवश्यक आहे.

१. अनुसूचित वृक्षाचे तोडीस परवानगी देणे बाबतचा महाराष्ट्र वृक्ष तोड (नियमन) अधिनियम-१९६४ अंतर्गत विहीत केलेल्या नमुन्यांतील खातेदाराचा अर्ज, तसेच खातेदार हे अनुसूचित जमाती पैकीचे असल्यास, महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवटदाराच्या झाडाची विक्री करणे (नियमन) अधिनियम-१९६९ अंतर्गत विहीत केलेला अर्ज सुध्दा जोडणे आवश्यक आहे.

२. झाडोरा तोडू इच्छिणाऱ्या संबंधित मालकी सर्व्हे नंबर/गटाचे तलाठ्याकडील साक्षांकित ७/१२ उतारे.

३. खातेदाराने धारण केलेल्या एकूण क्षेत्राचा तपशील दर्शविणारा गाव नमुना-८ अ चा साक्षांकित उतारा.

10:08 PM 0.05K/s Jio 4G 4G VoLTE 42%



४. संबंधित सर्व्हे/गट नंबरचे क्षेत्र खातेदारांच्या नावे दाखल असल्याबाबतच्या तपशील दर्शविणारा गाव नमुना नंबर-६ चा साक्षांकित उतारा.

५. संबंधित क्षेत्र खातेदाराचे नावे दिनांक ३०-८-७५ नंबर दाखल झालेले असल्यास दिनांक ३०-८-७५ रोजी ते कोणाचे नावे होते व किती होते या बाबतचा तपशील दर्शविणारा गाव नमुना-६ चा साक्षांकित उतारा.

६. झाडोरा तोडणेस प्रस्तावित असलेल्या सर्व्हे/गटाचे क्षेत्राचा पोट, हिस्साच्या तपशिलासह मंडळ निरीक्षकांनी साक्षांकित केलेला हद्दीचा नकाशा.

७. संबंधित क्षेत्राच्या हद्दीची खात्री करून, ती प्रकरणांतील हद्दीच्या निशाण्यात हुकुम असल्याबाबतचा मंडळ निरीक्षकाकडील दाखला.

८. संबंधित सर्व्हे/गट नंबरच्या हद्दीच्या निशाण्याची मंडळ निरीक्षकाने साक्षांकित केलेली यादी.

९. संबंधित क्षेत्रातील मंडळ निरीक्षकांनी साक्षांकित केलेली उभ्या झाडांची जातवार यादी.

१०. खातेदारांचे दिनांक ३०-८-७५ रोजी धारण क्षेत्र १२-०० हेक्टर आतील असल्यासंबंधीत तहसिलदार/नायब तहसिलदारयांचेकडील दाखला.

११. संबंधित क्षेत्र खातेदाराच्या नावे दिनांक ३०-८-७५ नंतर दाखला झालेले असल्यास दिनांक ३०-८-७५ रोजी ते ज्याचे नावे होते, त्यांचे धारण क्षेत्र दिनांक ३०-८-७५ रोजी १२-०० हेक्टरचे आंतील असल्याबद्दलचा तहसिलदार यांचे कडील दाखला.

१२. महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम १९७५ चे तरतुदीनुसार क्षेत्र संपादित होवून पुन:स्थापित झालेले असल्यास त्याबाबतचा उप-जिल्हाधिकारी, खाजगी वने यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत.

१३. ७/१२ उताऱ्यावरील नोंदीनुसार संबंधित क्षेत्र सामाईक हिस्सेदार असल्यास, अशा हिस्सेदारांचे बॉण्ड पेपरवर घेतलेले ना हरकत.

१४. अनुसूचित वृक्षापैकी फळ झाडाच्या तोडीस परवानगी मागितली असल्यास, फळे येण्यास बंद होवून झाडे, झाडे परिपक्व झाली असल्याबाबतचा फलोद्यान अधिकाऱ्यांकडील दाखला.

१५. खातेदार हे अनुसूचित जमातीचे नाहीत याची पडताळणी